| MHWS080009352021 | सं. फौजदारी खटला क्र. ५२५/२०२१<br>प्राप्त दिनांक - २३.०६.२०२१<br>नोंदणी दिनांक - २३.०६.२०२१<br>निकाल दिनांक- २०.०५.२०२६<br>कालावधी - ०४ व. १० म. २७ दि. |
|---|---|

**भाग–'अ'**

**अर्ज क्र. ३२**

**(Title Page of the Judgment)**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(i) नुसार**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी(कोर्ट नं. १), रिसोड यांचे न्यायालयात**

**(समक्षः पी. व्ही. सपकाळ)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ५२५/२०२१** **अपराध क्र.८२६/२०२०**

**निशाणी क्र. ३२**

महाराष्ट्र शासन मार्फत,

पोलिस स्टेशन रिसोड. **....फिर्यादी**

**....विरुध्द....**

अशोक गिरीधरप्रसाद पांडे,

वय–७० वर्षे, व्यवसाय–शेती

रा. सवड ता. रिसोड जि. वाशिम. **...आरोपी**

**दोषारोप – भा.द.वि. कलम ३४१, ५०४, ५०६ प्रमाणे...**

---

श्री. एम.डी.अडकिने, सहा. सरकारी अभियोक्ता

आरोपीकरिता श्री. एस. व्ही. मोरे विधीज्ञ.

---

### भाग– 'ब'

| अनु.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गुन्हा घडल्याचा दिनांक | १५.११.२०२० |
| ०२. | प्रथम खबर अहवाल दिनांक | १५.११.२०२० |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २३.०६.२०२१ |
| ०४. | दोषारोप निश्चिती दिनांक | २६.११.२०२४ |
| ०५. | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०९.०१.२०२५ |
| ०६. | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | २०.०५.२०२६ |
| ०७. | न्यायनिर्णयाचा  दिनांक | २०.०५.२०२६ |
| ०८. | निकाल सुनावनीचा दिनांक | २०.०५.२०२६ |

### आरोपीचा तपशिल

| अनु. क्र. | आरोपीचे नांव | नोटीस दिनांक | जामीन दिनांक | गुन्हा कलम | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ अंतर्गत भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | अशोक गिरीधरप्रसाद पांडे | अटक पंचनामा दि. १६.११.२० २० | १५.१०.२ ०२४ | भा.द.वि. कलम ३४१, ५०४, ५०६ प्रमाणे | निर्दोष | – | – |

### भाग-क
### ( फौजदारी नियमावली प्रकरण ०६ कलम ४४(iii) नुसार )
### सा क्षी दा रां ची या दी

(अ) अभियोगपक्ष/सरकार पक्ष –

| अनु.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१. | अशोकप्रसाद बंकटप्रसाद तिवारी | १२ | घटनास्थळ पंच |
| ०२. | सतिष द्वारकादास पांडे | १६ | फिर्यादी |
| ०३. | नंदकिशोर उर्फ आकाश सतिष पांडे | १९ | साक्षीदार |
| ०४. | लक्ष्मण नारायण कोल्हे | २० | घटनास्थळ पंच |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५. | गजानन हरीभाउ पांचाळ | २६ | तपासी अधिकारी |

**(ब) बचाव पक्षाचे आणि (क) न्यायालयीन साक्षीदार असतील तर –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| — | — | — |

## <u>कागदपत्रांची यादी न्यायालय निशाणी क्रमांक</u>

**(ड) अभियोग पक्ष**

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | जबानी रिपोर्ट | १७ |
| ०२. | प्रथम खबर अहवाल | १८ |
| ०३. | घटनास्थळ पंचनामा | २८ |
| ०४. | फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे आरोपीची जबानी | २९ |

**(इ) मुद्देमाल तपशिल–**

| अनु.क्र. | साहित्य वस्तू | तपशिल |
|---|---|---|
| - | – | - |

## <u>न्यायनिर्णय</u>

**०१.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता माझे विचारार्थ खालील प्रश्न उपस्थित होतात त्यांना मी माझे सकारण निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | दि.१५.११.२०२० रोजी, सकाळी १०.०० वाजणेच्या सुमारास, ग्राम सवड ता. रिसोड येथे आरोपीने फिर्यादी सतिष द्वारकादास पांडे व त्याचा मुलगा आकाश यांचा रस्ता बेकायदेशीरपणे आडवला आणि त्याद्वारे **भा.दं.वि. कलम ३४१** | |

| | | |
|---|---|---|
| | **अन्वये** गुन्हा केला असे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? | **...नकारार्थी.** |
| ०२. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादी व त्याचे मुलास दुखापत करण्याच्या उद्देशाने शिवीगाळ करुन सार्वजनिक शांततेचा भंग घडवून आणण्याचे दृष्टीने त्यांचा अपमान केला आणि त्याद्वारे **भा.दं.वि. कलम ५०४ अन्वये** आरोपीने गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **...नकारार्थी..** |
| ०३. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, फिर्यादी व त्यांचे मुलास दुखापत करण्याच्या उददेशाने फिर्यादी व साक्षीदारावर फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे **भा.दं.वि. कलम ५०६ अन्वये** आरोपीने गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **...नकारार्थी..** |
| ०४. | आदेश काय ? | सबळ पुराव्या अभावी आरोपीस निर्दोशमुक्त करणेत आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. ०१ ते ०३ करीताः–**

(मुद्दे क्र. ०१ ते ०३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची चर्चा एकत्रीत करण्यात आली आहे.)

०२ सदर कामी अभियोग पक्षामार्फत एकूण ०५ साक्षीदारांना पुराव्याचे कामी तपासण्यात आले. त्यापैकी सा.क्र.०१ व ०४ हे घटनास्थळ पंच असुन सदर दोन्ही साक्षीदार दिनांक १६.११.२०२० रोजी घटनास्थळ पंचनाम्यासाठी पोलीसांनी बोलावल्याचे नाकारतात तसेच त्यांचे समक्ष याकामातील घटनास्थळ पंचनामा केला नसल्याचे सांगुन त्यातील मजकुराची माहिती नसल्याचे कथन करतात. त्यामुळे सदर दोन्ही साक्षीदारांना अभियोग पक्षामार्फत फितुर घोषित करण्यात आले व त्यांचा जादा

सरतपास नोंदविण्यात आला मात्र त्यातही सदर दोन्ही साक्षीदार अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य करीत असल्याचे दिसुन येत नाही.

**०३** याकामी महत्वाचा साक्षीदार म्हणजेच फिर्यादीला नि.क्र.१६ वर तपासलेले आहे. फिर्यादी त्याचे सरतपासात असे कथन करतो की, त्याची व आरोपीची जमीन एकाच गटात असुन घटना दिनांक १५.११.२०२१ रोजी सकाळी १०.३० वा. चे सुमारास रिसोड व सवड गावचे शिवेजवळ घडली. त्यावेळी तो व त्याचा मुलगा आकाश दुचाकी वरुन शेतात निघाले असता रस्त्यात आरोपीचा स्प्रींकलरचा पाईप होता. त्यावेळी त्यांची दुचाकी पाईप वरुन गेल्यानंतर आरोपी पळत आला व फिर्यादी व त्याचे मुलास शिवीगाळ केली. आरोपीने १० ते १५ पाईप फोडल्याचे बोलुन रस्ता आडवला. त्यामुळे फिर्यादीने नि.क्र.१७ नुसार फिर्याद दाखल केली असुन घटनास्थळातील फोटो ओळखल्याने त्यास आर्टीकल अ व ब देण्यात आले.

**०४** उलट तपासात फिर्यादीने आरोपी त्यांचेवर आळ घेत असल्याचे, आरोपीचा व त्याचा एकच गट क्रमांक असल्याचे, घटना रिसोड व सवडच्या शिवेजवळ घडल्याचे, त्यांची दुचाकी गेलेला पाईप स्प्रींकलरचा असल्याचे बयाणात पोलीसांनी का नमुद केले नाही त्याचे कारण सांगता आले नाही. पुढे उलटतपासात फिर्यादी तपासकामी भुमी अभिलेखचा नकाशा अथवा रस्त्या संदर्भात कोणताही आदेश पोलीसांना दिला नसल्याचे मान्य केले.

**०५** तदनंतर साक्षीदार क्रमांक ०३ आकाश पांडे या फिर्यादीच्या मुलास नि.क्र.१९ वर तपासले त्याने त्याचे पुराव्यात असे कथन केले की, घटना दिनांक १५.११.२०२१ रोजी सकाळी १०.३० वा. चे सुमारास रिसोड व सवड गावचे शिवेजवळ घडली. त्यावेळी तो व फिर्यादी दुचाकी वरुन शेतात जात असतांना रस्त्यात आरोपीच्या स्प्रींकलरच्या पाईप वरुन दुचाकी गेली त्यामुळे आरोपी पळत आला व त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर ते दोघेही घरी आले व फिर्यादीने फिर्याद नोंदविल्याचे सांगितले. उलटतपासात घटना सवड ते रिसोड शिव रस्त्यावर घडल्याचे, आरोपीचे स्प्रींकलरचे पाईप वरुन पाणी चालु असुन भरपुर पाईप तोडल्याचे, घरी परत आल्याचे

पोलीस बयाणात का नमुद नाही याचे कारण सांगता येत नसल्याचे मान्य करुन रस्ता अडथळा बाबत इतर कोठेही तक्रार केली नसल्याचे कबुल केले.

**०६** याकामी अभियोग पक्षातर्फे शेवटचा साक्षीदार तपासी अधिकारी यांना नि.क्र.२६ वर तपासले. त्यांनी त्यांचे पुराव्यात नि.क्र.१७ वरील लेखी आदेशान्वये तपासकाम प्राप्त झाल्याचे सांगुन दिनांक १६.११.२०२० रोजी पंचांना नि.क्र.२७ प्रमाणे समजपत्र पाठवुन नि.क्र.२८ प्रमाणे घटनास्थळ पंचनामा केल्याचे सांगितले. त्यांनतर आर्टीकल अ व ब वरील घटनास्थळाचे फोटो काढुन साक्षीदार आकाश व रेखा यांचे जबाब नोंदविले असुन आरोपीस फौ.प्र.सं.चे कलम ४१-१ नुसार नोटीस देउन तपासाअंती गुन्हा निष्पन्न झाल्याने दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगितले. उलटतपासात सदर साक्षीदार यांनी घटनास्थळ शेता शेजारी अन्य शेतमालकांचे बयाण नोंदविले नसल्याचे नमुद करुन तपासकामी घटनास्थळाचा नकाशा आर्टीकल अ व ब वरील फोटो काढणाऱ्या व्यक्तीचे बयाण नोंदविले नसल्याचे मान्य केले. पंचनाम्यावेळी गावचे तलाठयांना घटनास्थळी बोलावले नसल्याचे कथन केले आहे.

**०७** अभियोग पक्षातर्फे युक्तिवाददरम्यान असे कथन करण्यात आले की, जरी घटनास्थळ पंच साक्षीदार पंचनाम्याबाबत सांगत नसले तरी, फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने घटनेबाबत सर्व खुलासा नमुद केलेला आहे. आरोपीने फिर्यादी व त्याच्या मुलाचा शेतात जाणारा रस्ता आडवुन त्यांना शिवीगाळ व दमदाटी केली. तपासी अधिकारी देखील फिर्यादीचे पुराव्यात नमुद घटनेस दुजोरा देतात. घटनेवेळी इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हजर नव्हते. या ठिकाणी भा.दं.वि. कलम ३४१ चा गुन्हा आरोपी विरुद्ध सिद्ध होत असुन घटना ठिकाणी रस्ता नसल्याचे आरोपीने शाबीत केले नाही. अभियोग पक्षामार्फत महाराष्ट्र शासन वि. तुळशीराम भानुदास कांबळे व इतर हा न्यायनिवाडा दाखल करुन पुर्वीचे वैमनस्य हा बचाव आरोपीच्या विरुद्ध देखील वापरता येत असल्याचे कथन केले. आरोपी विरुद्ध निश्चीत करण्यात आलेले दोषारोप अभियोग पक्षाने सिद्ध केले असल्यामुळे आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा द्यावी अशी विनंती केली.

<u>०८</u> आरोपी तर्फे विधिज्ञाने केलेल्या युक्तिवादा नुसार फिर्यादीचा पुरावा व त्याने दाखल केलेला जबानी रिपोर्ट यामध्ये बरीच तफावत असुन फिर्यादीला आरोपीचे शेतात जाण्याचा रस्ता कधीही अस्तीत्वात नव्हता. फिर्यादीतर्फे तसा रस्ता दर्शविनेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी सादर केलेला नसुन घटनास्थळी आरोपीने फिर्यादीचा रस्ता कधीही अडवलेला नव्हता. याकामातील दोन्ही पंच साक्षीदार घटनास्थळ पंचनामा त्यांचे समक्ष झाल्याचे नाकारत असल्यामुळे घटनास्थळ पंचनामा शाबीत झालेला नाही. अभियोग पक्षाने आरोपी विरुद्धचे दोषारोप शंकेपलीकडे जावुन सिद्ध केले नसल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करावे अशी विनंती केली.

<u>०९</u> वर नमुद अभियोग पक्षाचा एकंदरीत पुरावा पाहता साक्षीदार क्र.०२ व ०३ हे अत्यंत महत्वाचे साक्षीदार ठरतात त्यामुळे त्यांचा साक्षपुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे गरजेचे ठरते. साक्षीदार क्र.०२ फिर्यादी व साक्षीदार क्र.०३ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे दोघेही त्यांचे पुराव्यामध्ये घटनेची चुकीची तारीख नमुद करतात. नि.क्र.१७ वरील जबानी रिपोर्ट पाहता घटना दिनांक १५.११.२०२० रोजी घडलेली असुन साक्षीदार क्र.०२ व ०३ मात्र घटना दिनांक १५.११.२०२१ रोजी घडल्याचे सांगतात. जबानी रिपोर्ट पाहता घटनेवेळी सुरुवातीला आरोपीने फिर्यादी व त्याच्या मुलाचा रस्ता आडवुन त्यांना शिवीगाळ केल्याचे व धमक्या दिल्याचे कथन केलेले आहे. मात्र साक्षीदार क्र.०२ व ०३ त्यांचे न्यायालया समोरील पुराव्यात घटनेवेळी त्यांची दुचाकी आरोपीच्या स्प्रींकलरच्या पाईप वरुन गेल्यानंतर आरोपी तेथे पळत आल्याचे व त्यांनतर शिवीगाळ केल्याचे कथन करतात. यावरुन घटना निश्चीत कोणत्या प्रकारे घडली याचा योग्य प्रकारे बोध होत नाही.

<u>१०</u> फिर्यादी त्याचे जबानी रिपोर्ट मध्ये तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार त्याचे बयाणामध्ये कोठेही आरोपीचा पाईप हा स्प्रींकलरचा पाईप असल्याचे नमुद करत नाही. मात्र पुराव्यात सदर दोन्ही साक्षीदार त्यांची दुचाकी आरोपीच्या स्प्रींकलरच्या पाईप वरुन गेल्याचे कथन करतात. फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या पुराव्यात जो रस्ता आरोपीने आडवला असे कथन करतात त्या रस्त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा म्हणजेच रस्त्याबाबतचा नकाशा अथवा ज्या न्यायालयाने रस्ता दिला त्या न्यायालयाचा

त्यासंबंधाने पारीत केलेला आदेश याकामी दाखल केल्याचे दिसुन येत नाही. याकामी आर्टीकल अ व ब वर घटनास्थळाचे फोटो दाखल केलेले असुन सदर फोटो काढणाऱ्या व्यक्तीस साक्षीदार म्हणुन तपासलेले नसल्याने सदरचे फोटो देखील सबळरीत्या शाबीत होत नाहीत. सदर फोटोवरुन ते निश्चीत कोणत्या गटाचे आहेत हे स्पष्ट होत नसुन सदर फोटोंमध्ये कोणताही रस्ता ठळकपणे दिसुन येत नाही. त्यामुळे फिर्यादी व त्याचा मुलगा दुचाकीने रस्त्याने जात असतांना आरोपीने तो रस्ता बेकायदेशीरपणे अडवल्याचे सबळ पुराव्याने अभियोग पक्षास शाबीत करता आल्याचे दिसुन येत नाही.

<u>११</u> फिर्यादीने त्याचे उलटतपासात बऱ्याचशा महत्वाच्या बाबी सरतपासात प्रथमतः नमुद केलेले असुन त्या मुळ जबानी रिपोर्ट मध्ये नमुद नसल्याचे मान्य केलेले आहे. तसेच रस्त्याबाबत कोणताही नकाशा अथवा आदेश सादर केला नसल्याचे देखील कबुल केले आहे. याकामातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.०३ हा घटनेवेळी आरोपीने रस्ता आडवल्यामुळे घरी परत गेल्याचे कथन करतो मात्र त्याउलट फिर्यादी त्याचे जबानी रिपोर्टमध्ये घटनेनंतर तो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार दुचाकीने त्यांचे शेतात निघुन गेल्याचे कथन करतो यावरुन फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे घटनेबाबत वेगवेगळया स्वरुपाची कथने करत असल्याचे स्पष्ट होते.

<u>१२</u> याकामी अभियोग पक्षाने तपासलेले दोन्ही घटनास्थळ पंच साक्षीदार अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य करत नसुन त्यांचे समक्ष घटनास्थळ पंचनामा केल्याचे व तो वाचुन त्यावर सही केल्याचे नाकारतात. याकामी तपासी अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्याद्वारे घटनास्थळ पंचनामा केल्याचे कथन केले असले तरी सदरचा घटनास्थळ पंचनामा त्यावरील पंच साक्षीदारांचे दुजोरा देणाऱ्या साक्षपुराव्या शिवाय सबळपणे शाबीत झाले असे म्हणता येणार नाही.

<u>१३</u> तपासी अधिकारी यांनी त्यांचे पुराव्यात अन्य साक्षीदार रेखा हिचे बयाण नोंदविल्याचे कथन केले असले तरी सदर साक्षीदारास अभियोग पक्षाने तपासलेले नाही. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनाम्यावेळी संबंधित तलाठी यांना घटनास्थळी बोलावले नसल्याचे मान्य केलेले आहे. यावरुन घटनास्थळी रस्ता होता किंवा कसे हे

सांगु शकणारा साक्षीदार म्हणजेच संबंधित तलाठी याची घटनास्थळी हजेरी महत्वाची असतांना देखील त्याबाबत योग्य तो तपास तपासी अधिकारी यांनी केला नसल्याचे दिसुन येते. सदर तपासी अधिकारी यांनी घटनास्थळा शेजारी अन्य इतर कोणत्याही शेत मालकांचे बयाण नोंदविलेले नसल्याचे उलटतपासात मान्य केले. सदर शेजारील शेतमालकांचे बयाण घटनास्थळी रस्ता असल्याचे शाबीत करणे करीता अत्यंत गरजेचे असुनही त्याबाबत तपासकामी योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

<u>१४</u> वर नमुद केल्या प्रमाणे अभियोग पक्ष घटनास्थळी रस्ता असल्याची वस्तुस्थिती सबळपणे शाबीत करणेत यशस्वी झाल्याचे दिसुन येत नाही. तसेच फिर्यादी व साक्षीदार क्र.०३ यांचे पुरावे पाहता जबानी रिपोर्ट व यापुर्वीचे बयाण यामध्ये बरीच तफावत आढळुन येते. त्यामुळे अभियोग पक्षामार्फत आरोपी विरुद्ध निश्चीत करण्यात आलेले भा.दं.वि. कलम ३४१ शंकेपलीकडे जावुन सिद्ध झाल्याचे दिसुन येत नाही. फिर्यादी अथवा सा.क्र.०३ याने घटनेवेळी आरोपीने त्यांना शिवीगाळ केल्याचे कथन केलेले असले तरी मुळ जबानी रिपोर्ट व दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यात सदर शिवीगाळीचे अथवा दमदाटीचे निश्चीत शब्दांकन नमुद केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे या ठिकाणी भा.दं.वि. कलम ५०४ व ५०६ हा दोषारोप आरोपी विरुद्ध शंकेपलीकडे जावुन सिद्ध झाल्याचे दिसुन येत नाही. सबब मी मुद्दा क्र. ०१ ते ०३ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे.

<u>**मुददा क्र.०४ करीता**</u>

<u>१५</u> उपरोक्त विवेचनावरुन अभियोग पक्षाने मुळातच गुन्हयाचे मुलतत्व संयुक्तीक संशयाचे पुढे जाउन आरोपीवरील गुन्हा निर्विवादपणे सिध्द केलेला नाही. वर नमूद सर्व वस्तूस्थीती व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा पाहता आरोपी विरुध्द शंकेपलीकडे जावून गुन्हा शाबीत होत नाही. त्यामुळे मुददा क्र.०४ चे अनुषंगाने खालीलप्रमाणे न्यायोचीत असा आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **अशोक गिरीधरप्रसाद पांडे** रा. सवड ता. रिसोड जि. वाशिम याची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये भा.दं.वि. कलम ३४१, ५०४ व ५०६ मधील शिक्षापात्र गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौ.प्र.सं.कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– किंमतीचा जामीन, सदरकामी या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास अपील कोर्टामध्ये हजर राहण्याकरीता दाखल करावा.

(सदरहू न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर केला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.05.20 15:49:50 +0530

ठिकाण – रिसोड (पी.व्ही.सपकाळ)

दिनांक – २०.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रिसोड,

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Shri. P. V. Sapkal<br>J.M.F.C. Risod Dist. Washim |
| Name of Steno | :- | Dipak Y. Bansode (Jr. Clerk) |
| Date of Decision judgment/order | :- | 20.05.2026 |
| Signed by Presiding Officer On | :- | 20.05.2026 |
| judgment/order upload on | :- | 20.05.2026 |